निशाणी क्रमांक १६ लगत  एम.जे.सी.क्र.१९/२०२३

<u>उलटतपास जाबदेणारतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. मेहाडीया यांच्या मार्फत</u>

१. हे म्हणणे खरे नाही की, दावा क्र. ४९/२०१३ हा पॉवर ऑफ अटरनीच्या आधारे दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पॉवर ऑफ अटरनी अंजनाबाई हिने दिली होती. मी प्रस्तुत प्रकरणात देखील पॉवर ऑफ अटरनी दाखल केली आहे. आता मला प्रस्तुत दाव्यात दाखल पॉवर ऑफ अटरनी दाखविण्यात आली ती तिच आहे. (उलटतपासादरम्यान जाबदेणार यांच्या विधीज्ञांनी साक्षीदारास पॉवर ऑफ अटरनी दाखविली त्यामुळे त्यास ओळख पटविण्याकरिता **निशाणी १९** देण्यात येत आहे.) हे म्हणणे खरे आहे की, अंजनाबाई आजरोजी हयात नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंकज, विमल, नेपालसिंग आणि राजू या चारही लोकांचा मृत्यू झाला आहे.

२. हे म्हणणे खरे आहे की, मी निशाणी १९ व्यतिरीक्त इतर कोणतीही पॉवर ऑफ अटरनी प्रस्तुत केसमध्ये दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १९ वरील पॉवर ऑफ अटरनी ही सर्व अर्जदारांकरिता आहे असा उल्लेख सदर पॉवर ऑफ अटरनीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. ७ ते १० यांनी मला कोणत्याही प्रकारची पॉवर ऑफ अटरनी दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. ७ ते १० यांनी मला पॉवर ऑफ अटरनी दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, पंकज शांडील्य, राजु शांडल्य, हिम्मत शांडल्य यांचा मृत्यू झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा जन्म अंजनसारा येथे झालेला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझा जन्म आसोला येथे झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुळ नाव सुरेश देवीसींग बैस असे आहे.

**प्रश्नः** दिनांक १५/०४/२०१९ रोजी तुम्ही दाखल केलेला दावा क्र. ४९/२०१३ हा डिसमीस करण्यात आला होता?

**उत्तरः** त्यावेळी आम्ही खोट्या केसमध्ये जेलमध्ये असल्यामुळे अर्ज करु शकलो नाही. त्यामुळे दावा डिसमिस झाला होता.

४.   हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्या केसमध्ये, कोणत्या तारखेपासून, कोणत्या तारखेपर्यंत व किती कालावधीपर्यंत जेलमध्ये होतो याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला दावा ४९/२०१३ हा दिनांक १५/०४/२०१९ रोजी डिसमीस झालेला आहे.

५.   मी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापूर्वी दावा क्र. ४९/२०१३ चे कोर्टाचे पूर्ण कागदपत्र वकिलांना दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत अर्जासोबत मी उशीर माफीचा अर्ज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत अर्जात अर्ज दाखल करण्यास उशीर का झाला याचे कारण नमूद केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात जाबदेणार यांनी दाखल केलेला जबाब मला मिळाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी १६ हे जाबदेणार यांनी निशाणी ११ वर जबाब दाखल केल्यानंतर दाखल केलेले आहे.

६.   हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी फौ.कि.अर्ज क्रमांक ६२/२०२१ दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर केस मध्ये दिनांक २६/०२/२०२१ रोजी मी न्यायालयात हजर होतो. सदर मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज मी व माझ्या बहिणीने मिळून दाखल केला होता. माझ्या बहिणीचे नाव उषा शांडील्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यू प्रमाणपत्राची केस आणि दावा क्र. ४९/२०१३ हे एकाच न्यायालयात प्रलंबित होते. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केसमध्ये मी एकटाच अर्जदार होतो.

७.   (उलटतपासादरम्यान जाबदेणार यांचे विधीज्ञ यांनी साक्षीदारास फौ. कि. अर्ज क्रमांक ६२/२०२१ आणि त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत दाखविली, त्यामुळे त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. २२** आणि **२३** देण्यात येत आहे.) हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्ज हा मी एकट्याने दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०३/२०२१ आणि दिनांक ०४/०९/२०२१ ह्या तारखा फौ. कि. अर्ज क्रमांक ६२/२०२१ तसेच दावा क्र. ४९/२०१३ या दोन्ही केससाठी नेमण्यात आलेल्या होत्या.

**प्रश्नः**   दावा क्र. ४९/२०१३ दिनांक ०९/०१/२०२३ रोजी खारीज झालेला आहे?
**उत्तरः**   मला दावा खारीज झाल्याची निश्चीत तारीख आठवत नाही.

८.   हे म्हणणे खरे आहे की, दावा क्र. ४९/२०१३ खारीज झाल्याचा आदेश मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला आदेश हा दिनांक ०९/०१/२०२२ रोजीचा आदेश आहे. सदर आदेश हा नि. ९६ आणि १ वर पारीत झालेला आहे. सदर दोन्ही आदेश हे दिनांक ०९/०१/२०२२ रोजी पारीत झालेले आहेत.

**९.** हे म्हणणे खरे नाही की, मला सर्व अर्जदारांतर्फे प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

[ **व्ही. आय. शेख** ]

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा.

दिनांक : ०६/१२/२०२५

ठिकाण : हिंगणा